पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ३८ /२०२२ दि.२८/०४/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी**, भिवंडी शहरात दि. ०३/०५/२०२२ रोजी किंवा एक दिवस मागे–पुढे चंद्र दर्शनाचे दिवशी मुस्लिम बांधवांचा **"रमजान ईद"** हा सण साजरा होणार आहे. सदर दिवशी मुस्लिम बांधव मोठया प्रमाणात पहाटे पासूनच नमाज पडणेसाठी वेगवेगळया मशिदीमध्ये मोठया संख्येने जमा होतात. सदर वेळी भिवंडी शहरातील वाहतुक सुरळीत व सुरक्षित रहावी, वाहतुकीची कोंडी होऊ नये, याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी** मी, बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) मुंबई/ठाणे/मानकोली कडुन जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणा–या जड/अवजड वाहनांना अंजुरफाटा या ठिकाणी **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कारीवली जकात नाका रोडने विटभट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई–ठाणे कडुन जुना ठाणे आग्रा रोडने अंजुरफाटा कडून भिवंडी शहरात येणा–या टी.एम.टी./एस.टी., सर्व प्रकारच्या बसेस व हलक्या वाहनांना नारपोली पो. स्टे. येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** टी.एम.टी./एस.टी. मधील प्रवासी सदर ठिकाणी उतरतील व तेथुनच प्रवासी घेवून परत जातील तसेच हलकी वाहने ही देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) रांजनोली चौकातुन भिवंडी शहरात येणा–या एस.टी./के.डी.एम.टी. बसेस, जड/अवजड वाहने, कार, रिक्षा, दुचाकी वाहनांना रांजनोली नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची एस.टी./के.डी.एम.टी. बसेस, रिक्षा रांजनोली नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथुनच प्रवासी भरुन इच्छित स्थळी जातील व इतर वाहने ही रांजनोली नाका येथुनच वळसा घेवून परत जातील.

**प्रवेश बंद –** ४) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणा–या सर्व प्रकारच्या जड/अवजड वाहनांना पारोळ नाका (नदीनाका) येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने हि अंबाडी नाका येथुन राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणा–या सर्व हलक्या वाहनांना मेट्रो हॉटेल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची हलकी वाहने मेट्रो हॉटेल येथे उजवीकडे वळून संगमपाडा रोड–अजय नगर पर्यत येवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) वडपा चेकपोस्ट मार्गे वाडयाकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवीकडे वळण घेवून पाईपलाईन मार्गे वाडयाकडे इच्छित स्थळी जातील.

ब) तसेच एस.टी. बसेस आपले प्रवासी सदर ठिकाणी उतरवतील व तेथुनच प्रवासी घेवून बस वळवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ७) छत्रपती शिवाजी महाराज चौक कडून वंजारपाटी नाका मार्गे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने अजय नगर–संगमपाडा–मेट्रो हॉटेल येथून डावीकडे वळून वंजारपाटी ब्रिज वरुन इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना ही **"रमजान ईद"** म्हणजेच दि. ०३/०५/२०२२ रोजी किंवा एक दिवस मागे–पुढे चंद्रदर्शनाचे दिवशी सकाळी ०६.०० ते १०.०० वाजेपावेतो अंमलात राहील. सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

Scanned with CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम/ पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर
मा. आयुक्त, निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी,/बृहन्मुंबई.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—२/वि.शा.ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत:— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी, कल्याण व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग ठाणे.

Scanned with CamScanner